स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२५–२६/३७२ दि. २०/११/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे शहर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी, पुणे नदी स्वच्छता अभियान महोत्सवामध्ये रासेयो स्वयंसेवकांच्या सहभागाबाबत...

संदर्भ : १.मा.उप आयुक्त, पर्यावरण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे जावक क्र.७१८, दि.२०/११/२०२५ रोजीचे पत्र
२. संदर्भ क्र.१ चे पत्र मा. क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचालनालय, युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांच्यामार्फत अग्रेषीत

महोदय,

मा. उप आयुक्त, पर्यावरण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या पत्रानुसार स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने 'नदी स्वच्छता मोहीम' महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. नोव्हेंबर महिन्याचा शेवटचा आठवडा "River Week" म्हणून साजरा केला जातो. तसेच "२ डिसेंबर" हा "राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस" म्हणून साजरा केला जातो. त्यानुषंगाने "नदी स्वच्छता मोहीम" महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

सदर उपक्रमासाठी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त रासयो स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांनी रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी, स. ०७ वाजता बाबा भिडे पुलापासून गुलमोहर हाऊसिंग सोसायटी, डेक्कनपर्यंत मुळा नदीचा काठ याठिकाणी सहभागी व्हावे. तसेच सहभागी स्वयंसेवकांची ऑन लाईन नाव नोंदणी https://forms.gle/etD3KafXgGhrqnbz8 या लिंकवरती करण्यात यावी. या उपक्रमामध्ये महाविद्यालयामार्फत पुणे महानगरपालिकेला योग्य ते सहकार्य करण्यात यावे.

सदर उपक्रमात सहभागी होताना रासेयो स्वयंसेवकांकडे रासेयो बॅज असणे आवश्यक आहे आणि रासेयो बॅनरचा वापर करणे बंधनकारक आहे. तसेच उपक्रम संपन्न झाल्यानंतर उपक्रमाचा एकत्रीत अहवाल व फोटो त्वरीत nss_student_list@pun.unipune.ac.in या मेलवर "नदी स्वच्छता मोहीम २०२५" या विषयासह पाठवण्यात यावा. तसेच या उपक्रमांचे My Bharat पोर्टलवर Event Create करून अपलोड करण्यात यावे. सदर उपक्रमात सहभागींचा प्रवास खर्च महाविद्यालयातील नियमित कार्यक्रमातुन करण्यात यावा. कळावे, ही विंनती.

Bhame

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा.उप आयुक्त, पर्यावरण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र

पर्यावरण विभाग,
पुणे महानगरपालिका
जावक क्र:. ५७८
दिनांक : २०/११/२५

प्रति,
श्री. अजय ब. शिंदे
प्रादेशिक अधिकारी
प्रादेशिक संचलनालय, एन.एस.एस.
पुणे

यांजकडेस.....

विषय:- पुणे नदी स्वच्छता अभियान महोत्सवात दि. ३० नोव्हेंबर २०२५ एन. एस. एस. संघटनांचा सहभाग होणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये पुणे शहरातील मुठा नदीची स्वच्छता करणेसाठी पुणे महानगरपालिका, युवा फॉर ॲक्शन, इकोमन सर्व्हीसेस फाउंडेशन आणि जीवितनदी लिव्हिंग रिव्हर फाउंडेशन यांसारख्या स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने "नदी स्वच्छता मोहीम" महोत्सव साजरा करण्याचे नियोजित आहे. नोव्हेंबर महिन्याचा शेवटचा आठवडा "RIVER WEEK" म्हणून साजरा केला जातो तसेच "२ डिसेंबर" हा "राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस" म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने "नदी स्वच्छता मोहीम" महोत्सव साजरा करण्याचे नियोजित आहे.

**तपशील खालीलप्रमाणे आहे:**

**दिवस आणि तारीखः** रविवार, ३०नोव्हेंबर २०२५

**वेळः** सकाळी ७:०० -१०:००

**ठिकाणः** बाबा भिडे पुलापासून गुलमोहर हाऊसिंग सोसायटी, डेक्कनपर्यंत मुळा नदीच्या काठावर.

**नोंदणी लिंकः** https://forms.gle/etD3KafXgGhrqnbz8

सदर कार्यक्रमात विद्यार्थी, युवक, नागरिक, कॉर्पोरेट्स आणि स्वयंसेवी संस्था पुणे शहरातील मुठा नदीची स्वच्छता करण्यासाठी सहभागी होणार आहेत. हा उपक्रम केवळ स्वच्छता मोहिम नसून संपूर्ण शहराचा पर्यावरणीय उत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमाचा उद्देश हजारो स्वयंसेवकांना एकत्र आणून "स्वच्छ आणि हरित पुणे" घडविण्यासाठी नागरिक आणि संस्था एकत्रितपणे कार्य करणे हा आहे. एन.एस.एस. चे स्वयंसेवक सातत्याने सामुदायिक विकास आणि पर्यावरण विषयक कामकाज करत असतात. त्यांच्या सहभागामुळे या मोहिमेचा प्रभाव बळकट होईल म्हणून या उपक्रमात सहभागी होण्यासाठी पुणे शहरातील एन. एस. एस. संघटनांना सहभागी करून घेण्यासाठी तुमच्या सहकार्याची आवश्यकता आहे.

तरी आपणांस विनंती आहे की, पुणे शहरातील सर्व एन. एस. एस.कार्यालयांना स्वच्छता मोहीमेबाबत आपले मार्फत अवगत करणे व कार्यक्रमात एन. एस. एस. स्वयंसेवकांचा सहभाग वाढविणे व सर्व सहभागींची वरील लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

समन्वयासाठी, कृपया संपर्क साधाः

१) अश्विनी यादव, पर्यावरण विभाग, पीएमसी- ९६८९९३१८३२

२) इप्सिता नायक, संस्थापक, युवा फॉर ॲक्शन- ७८७५७४८८३५

या शहरव्यापी स्वच्छता मोहीमेत एन. एस. एस. मार्फत संपूर्ण सहकार्य लाभेल अशी अपेक्षा आहे.

कळावे,

(अविनाश सकपाळ)
उप आयुक्त, पर्यावरण विभाग
पुणे महानगरपालिका